Teachingninja.in

Latest Govt Job updates

Private Job updates

Free Mock tests available

Visit - teachingninja.in

Teachingninja.in

# MPSC

## Previous Year Paper

### Group C Prelims
### (Clerk-Typist) 2014

Teachingninja.in

लिपिक - टंकलेखक परीक्षा - 2014. परीक्षा दि. 27 जुलै, 2014.

# A

**2014** CODE : **WO4**

प्रश्नपुस्तिका क्रमांक
BOOKLET NO.

## प्रश्नपुस्तिका

वेळ : 2 (दोन) तास **मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, बुद्धिमापन चाचणी व अंकगणित** एकूण प्रश्न : 200
एकूण गुण : 400

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत **200** अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ↑ केंद्राची संकेताक्षरे | | | | | | ↑ शेवटचा अंक | |

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच ''उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरापैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील''.**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या ''परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82'' यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

**पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये**

Teachingninja.in

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

1. 'मी घरी पोचण्यापूर्वीच सांजावले' या वाक्यातील 'सांजावले' या क्रियापदास काय म्हणतात ?

(1) अनियमित क्रियापद (2) प्रयोजक क्रियापद (3) भावकर्तृक क्रियापद (4) सिद्ध क्रियापद

---

2. जोड्या जुळवा :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | द्वितीया | (i) | करण |
| (b) | तृतीया | (ii) | अधिकरण |
| (c) | चतुर्थी | (iii) | कर्म |
| (d) | सप्तमी | (iv) | संप्रदान |

वरील विभक्ती व कारक यांच्या जुळणीचा खालीलपैकी कोणता पर्याय **योग्य** आहे ?

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| (2) | (iii) | (iv) | (ii) | (i) |
| (3) | (iii) | (i) | (iv) | (ii) |
| (4) | (i) | (ii) | (iv) | (iii) |

---

3. नित्य, सदा, सर्वदा, सतत, नेहमी ही कोणती क्रियाविशेषण अव्यये आहेत ते लिहा.

(1) कालदर्शक (2) सातत्यदर्शक (3) आवृत्ती दर्शक (4) स्थल दर्शक

---

4. खालील व्यंजन गटातील अनुनासिकांचा योग्य गट ओळखा.

(1) ड, ञ, ण, न, म (2) ङ्, ञ्, ण्, न्, म् (3) ङ्, ण, न, म, स (4) ङ्, ण, न, म, ऋ

---

5. 'मरावे परी कीर्ति रूपे उरावे' या वाक्यातील 'परी' या अव्ययास काय म्हणतात ?

(1) परिणामबोधक उभयान्वयी अव्यय

(2) विकल्पबोधक उभयान्वयी अव्यय

(3) न्यूनत्वबोधक किंवा विरोधदर्शक उभयान्वयी अव्यय

(4) कारणबोधक उभयान्वयी अव्यय

---

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**



Teachingninja.in

6. योग्य जोड्या लावा :

| | **विभक्ती** | | **कारक** |
|---|---|---|---|
| (a) | प्रथमा | (i) | तुला |
| (b) | द्वितीया | (ii) | तू |
| (c) | तृतीया | (iii) | तुजहून |
| (d) | पंचमी | (iv) | तुजशी |

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (i) | (iv) | (iii) |
| (2) | (ii) | (i) | (iii) | (iv) |
| (3) | (ii) | (iii) | (i) | (iv) |
| (4) | (i) | (ii) | (iii) | (iv) |

7. भावे प्रयोगात क्रियापदाचे रूप ....

(1) वर्तमानकाळी असते

(2) कर्त्याच्या लिंगवचन पुरुषाप्रमाणे असते

(3) तृतीय पुरुषी नपुंसकलिंगी एकवचनी असते

(4) भविष्यकाळी असते

8. पुढीलपैकी देशी शब्द ओळखा.

(1) टेबल (2) बोका (3) पुष्प (4) कवी

9. 'तो गावोगाव भटकत फिरला' या वाक्यातील 'गावोगाव' हा शब्द कोणत्या समास प्रकारातील आहे ?

(1) उपपद तत्पुरुष समास (2) बहुव्रीही समास

(3) द्वंद्व समास (4) अव्ययीभाव समास

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

10. 'बाजीप्रभूने खिंड लढविली' या वाक्याचा प्रकार ओळखा.

(1) केवल वाक्य (2) मिश्र वाक्य (3) संयुक्त वाक्य (4) आज्ञार्थी वाक्य

11. पुढीलपैकी कोणता शब्द लेखन नियमानुसार अचूक मानण्यात येतो ?

(1) छिन्नविच्छिन्न (2) आयूष्य (3) अनुत्तिर्ण (4) श्रमीक

12. 'नीलकंठ' या शब्दाचा समास ओळखा.

(1) द्वंद्व समास (2) बहुव्रीही समास (3) कर्मधारय समास (4) द्विगू समास

13. 'उच्छेद' या जोडशब्दातील अचूक पोटशब्द ओळखा ?

(1) उ + च्छेद (2) उत + च्छेद (3) उच् + छेद (4) उत् + छेद

14. अव्ययसाधित विशेषणाचे उदाहरण कोणते ?

(1) मागील दार (2) पिकलेला आंबा (3) असल्या झोपड्या (4) बनारसी बोरे

15. पुढील वाक्यातील वर्तमानकाळाचे वाक्य ओळखा :

(1) सूर्य पूर्वेस उगवतो (2) तुम्ही पुढे व्हा, मी येतो

(3) मी बसलो तोच तुम्ही हजर (4) गुरुजी आत शाळेत असतील

16. पुढीलपैकी समाहार द्वंद्व समासाचे उदाहरण कोणते आहे ?

(1) नीलकंठ (2) मीठभाकर (3) आजन्म (4) जलद

17. 'आई त्या मुलाला हसविते' हे उदाहरण खालीलपैकी, कोणत्या क्रियापदाचे आहे ?

(1) शक्य क्रियापद (2) प्रयोजक क्रियापद (3) अनियमित क्रियापद (4) सिद्ध क्रियापद

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**



Teachingninja.in

18. 'रिकामटेकडा' हा शब्द मराठीत कोणत्या भाषेतून आला आहे ?

(1) कानडी (2) फारसी (3) अरबी (4) गुजराती

---

19. स्पष्टोच्चारित अनुनासिकाबद्दल शीर्षबिंदु द्यावा. या शुद्धलेखनाच्या नियमाप्रमाणे पुढील कोणते उदाहरण बरोबर आहे ?

(1) संयम (2) सिंह (3) चिंच (4) लोकांना

---

20. शब्दयोगी अव्यये वाक्यात स्वतंत्रपणे येतात तशी विभक्तीप्रत्ययेही स्वतंत्रपणे येऊ शकतात.

उत्तराचा **योग्य** पर्याय सांगा.

(1) हे संपूर्ण विधान चूक आहे. (2) विधानाचा पूर्वार्ध बरोबर आहे.

(3) विधानाचा उत्तरार्ध बरोबर आहे. (4) हे संपूर्ण विधान बरोबर आहे.

---

21. व्याकरणातील पुरुष ही संज्ञा लौकिक जीवनातील पुरुष या व्यक्तीशी संबंधित असून तृतीय पुरुषाच्या बाबतीत तिन्ही लिंगे येतात.

उत्तराचा **योग्य** पर्याय निवडा :

(1) या विधानाचा उत्तरार्ध चूक आहे (2) हे संपूर्ण विधान चूक आहे

(3) या विधानाचा उत्तरार्ध बरोबर आहे (4) हे संपूर्ण विधान बरोबर आहे

---

22. खालीलपैकी अर्थदृष्ट्या व व्याकरणदृष्ट्या बरोबर शब्द ओळखा.

(1) षष्ट्यब्दीपूर्ती (2) षष्ट्यब्धिपूर्ती (3) षष्ठ्यब्धीपूर्ती (4) षष्ठ्यब्दपूर्ती

---

23. करण म्हणजे ________.

(1) क्रियेचे साधन किंवा वाहन (2) क्रियेचा आरंभ

(3) क्रियेचे स्थान (4) वरील कोणताही पर्याय योग्य नाही

---

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**

Teachingninja.in

24. (a) बाळ, एवढा लाडू **खाऊन टाक.**

(b) बाळ, एवढा लाडू **खाऊन जा.**

(1) क्रमांक (a) चे विधान संयुक्त क्रियापदाचे आहे.

(2) क्रमांक (b) चे विधान संयुक्त क्रियापदाचे नाही.

(3) क्रमांक (a) व (b) चे विधान संयुक्त क्रियापदाचे आहे.

(4) क्रमांक (a) व (b) चे विधान संयुक्त क्रियापदाचे नाही.

---

25. मराठी वर्णमालेत एकूण स्वरांची संख्या किती ?

(1) 11 (2) 12 (3) 13 (4) 14

---

26. विस्तव, पावक, अग्नी, वन्ही या शब्दांना समानार्थी शब्द कोणता ?

(1) अमृत (2) अनल (3) अनिल (4) आकाश

---

27. दोन किंवा अधिक वाक्ये उभयान्वयी अव्ययांनी जोडली जातात तेव्हा ________.

(1) संयुक्त वाक्य बनते (2) मिश्र वाक्य बनते

(3) केवल वाक्य बनते (4) क्रियाविशेषण वाक्य बनते

---

28. शब्द व समास प्रकार यांच्या योग्य जोड्या जुळवा :

(a) कृष्णार्पण (i) तृतीया तत्पुरुष

(b) केळफुल (ii) इतरेतर द्वंद्व

(c) मातृसदृश्य (iii) चतुर्थी तत्पुरुष

(d) विटीदांडू (iv) षष्ठी तत्पुरुष

अचूक उत्तराचा पुढील **योग्य** पर्याय निवडा.

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (i) | (ii) | (iii) |
| (2) | (i) | (iii) | (ii) | (iv) |
| (3) | (ii) | (iv) | (i) | (iii) |
| (4) | (iii) | (iv) | (i) | (ii) |

---

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**



Teachingninja.in

**29.** 'तो काम करीत आहे' या वाक्यातील क्रियापदाचा प्रकार कोणता?

(1) संयुक्त क्रियापद (2) प्रयोजक क्रियापद (3) शक्य क्रियापद (4) उभयविध क्रियापद

---

**30.** संयुक्त वाक्यातील पोटवाक्ये प्रधान वाक्याशी उभयान्वयी अव्ययांनी जोडलेली असतात, उभयान्वयी अव्यये वेगळी केली की सर्व पोटवाक्ये केवलवाक्ये राहतात.

उत्तराचा **योग्य** पर्याय निवडा :

(1) वरील संपूर्ण विधान चूक आहे (2) वरील विधानातील पूर्वार्ध चूक आहे

(3) वरील विधानातील उत्तरार्ध चूक आहे (4) वरील संपूर्ण विधान बरोबर आहे

---

**31.** ताळा, अनरसा, किडूक मिडूक, शिकेकाई हे शब्द खालीलपैकी कोणत्या भाषेतून मराठीत आलेले आहेत?

(1) अरबी (2) हिंदी (3) तामिळी (4) तेलगू

---

**32.** विकारी शब्दांच्या ठिकाणी असलेला संख्या सुचविण्याचा गुणधर्म म्हणजे ________.

(1) आगम (2) वचन (3) संख्या विशेषण (4) समुदायवाचक नाम

---

**33.** खालीलपैकी षष्ठी विभक्तीचे प्रत्यय ओळखा :

(1) स, ला, ना, ते (2) चा, ची, चे, च्या (3) त, इ, आ (4) ने, ए, शी, नी

---

**34.** 'निष्कपट' या शब्दाची संधी खालीलपैकी कोणत्या पोटशब्दांनी केली जाते?

(1) निः + कपट (2) निष् + कपट (3) निष्क + पट (4) निःक + पट

---

**35.** 'तांडव नृत्य करणे' या वाक्प्रचाराला पुढीलपैकी कोणता वाक्प्रचार समानार्थी आहे?

(1) पित्त खवळणे (2) शंख करणे (3) तलवार गाजविणे (4) थयथयाट करणे

---

**36.** सावळाच रंग तुझा पावसाळि नभापरी! (अलंकार ओळखा)

(1) श्लेष अलंकार (2) यमक अलंकार

(3) अतिशयोक्ती अलंकार (4) उपमा अलंकार

---

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**

Teachingninja.in

37. धातू म्हणजे .....

(1) शब्दाचे सामान्यरूप (2) शब्दयोगी अव्ययाचा प्रकार

(3) क्रियाविशेषण अव्यय (4) प्रत्ययरहित क्रियावाचक शब्द

---

38. 'म' हे व्यंजन खालीलपैकी कोणत्या प्रकारात येते ?

(1) तालव्य व्यंजन (2) सजातीय स्वर (3) अनुनासिक (4) अघोषवर्ण

---

39. 'दादा पायी चालत आले' या वाक्यातील 'पायी' या सप्तमी विभक्तीच्या रूपाचा कारकार्थ कोणता ?

(1) अधिकरण (2) करण (3) अपादान (4) कर्ता

---

40. शब्दांच्या जाती किती ?

(1) 5 (2) 8 (3) 3 (4) 6

---

41. दोन नामे, वाक्ये किंवा एकवर्गीय शब्द जोडणाऱ्या शब्दाला कोणते अव्यय म्हणतात ?

(1) उभयान्वयी अव्यय (2) शब्दयोगी अव्यय

(3) केवलप्रयोगी अव्यय (4) क्रियाविशेषण अव्यय

---

42. विशेषण या शब्दजातीमध्ये...

(a) विशेषणे नामाचा गुणधर्म सांगतात.

(b) विशेषणांचा वाक्यात स्वतंत्रपणे उपयोग होतो.

(c) विशेषणांना लिंगवचनाचे विकार होतात.

(d) सर्व विशेषणे विकारी असतात.

वरीलपैकी कोणती विधाने **अचूक** आहेत ?

(1) (a), (b) आणि (d) (2) सर्व विधाने

(3) (a) आणि (c) (4) (a), (b) आणि (c)

---

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**



Teachingninja.in

**43.** स,ला,ते - स,ला,ना,ते हे कोणत्या दोन विभक्तींचे प्रकार आहेत ?

(1) प्रथमा व द्वितीया (2) द्वितीया व चतुर्थी (3) द्वितीया व तृतीया (4) द्वितीया व सप्तमी

---

**44.** 'असला नवरा नको ग बाई!' या वाक्यातील 'असला' हा शब्द कोणत्या विशेषण प्रकारातील आहे ?

(1) गुण विशेषण (2) दर्शक विशेषण (3) सार्वनामिक विशेषण (4) अनिश्चित विशेषण

---

**45.** पुढील वाक्यातील केवलप्रयोगी अव्यय ओळखा.

'अरेरे! काय दशा झाली त्याची!

(1) काय (2) अरेरे (3) दशा (4) त्याची

---

**46.** योग्य जोड्या जुळवा :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | संधी | (i) | एकत्व किंवा अनेकत्वाचा बोध |
| (b) | उपसर्ग | (ii) | नामा सर्वनामांचा क्रियापदाशी संबंध |
| (c) | वचन | (iii) | दोन शब्दांचा अर्थपूर्ण संयोग |
| (d) | कारकार्थ | (iv) | शब्दाआधी जोडली जाणारी अक्षरे |

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (i) | (iv) | (iii) |
| (2) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| (3) | (ii) | (iii) | (i) | (iv) |
| (4) | (iv) | (ii) | (iii) | (i) |

---

**47.** 'अमृताहुनि गोड नाम तुझे देवा' हे कोणत्या अलंकाराचे उदाहरण आहे ?

(1) अपन्हुती (2) व्यतिरेक (3) श्लेष (4) चेतनगुणोक्ती

---

**48.** 'किल्ली' हा शब्द कोणत्या भाषेतून मराठीत रूढ झाला आहे ?

(1) इंग्रजी (2) तामिळी (3) कानडी (4) हिंदी

---

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**

Teachingninja.in

49. 'वाहनांनी डाव्या बाजूने जावे' हे वाक्य खालील कोणत्या प्रकारात मोडते ?

(1) केवल वाक्य (2) संयुक्त वाक्य (3) मिश्र वाक्य (4) विद्यर्थ

---

50. खालील वाक्याचा प्रकार ओळखा.

'वेळेवर काम संपवले तर परतीची बस चुकणार नाही'.

(1) विधानार्थी (2) संकेतार्थी (3) नकारार्थी (4) आज्ञार्थी

---

51. 2014 मध्ये एव्हरेस्ट शिखर पादाक्रांत करणारी सर्वात तरूण महिला कोण ?

(1) छंदा गयेन (2) बचेंद्री पाल (3) व्हॅन्ग जींग (4) मालावत पूर्णा

---

52. __________ या दिवशी मुंबईकरांसाठी वर्सोवा ते घाटकोपर मार्गासाठी मुंबई मेट्रो चालू झाली.

(1) 5 जून 2014 (2) 8 जून 2014 (3) 10 जून 2014 (4) 1 मे 2014

---

53. 'ऑपरेशन ब्ल्यु स्टार' ही लष्करी कारवाई झाली तेव्हा भारतीय लष्कराचे प्रमुख __________ हे होते.

(1) जनरल व्ही.के. सिंग (2) जनरल अरूणकुमार वैद्य

(3) जनरल के.एस. ब्रार (4) जनरल विक्रम सिंग

---

54. डॉ. अभय बंग व डॉ. राणी बंग यांची 'सर्च' ही संस्था महाराष्ट्रातील कोणत्या जिल्ह्यात आहे ?

(1) चंद्रपूर (2) रायगड (3) वर्धा (4) गडचिरोली

---

55. 'बोको हराम' हे नायजेरिया मध्ये कार्यरत असणाऱ्या एका संघटनेचे नाव आहे. या नावाचा अर्थ __________ असा होतो.

(1) पाश्चिमात्य शिक्षण निषिद्ध आहे (2) ख्रिश्चन धर्म वाईट आहे

(3) अमेरिकेचा निषेध (4) हिंदूंचा निषेध असो

---

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**



Teachingninja.in

56. 'कृष्णाकाठ' या पुस्तकाचे लेखक कोण ?

(1) वसंतदादा पाटील (2) यशवंतराव चव्हाण (3) शंकरराव चव्हाण (4) वसंतराव नाईक

---

57. एका बीजा केला नास। मग भोगिले कणीस ।।1।।

कळे सकळा हा भाव । लहान थोरांवरी जीव ।।2।।

हा अभंग कोणी लिहीला ?

(1) संत एकनाथ (2) संत तुकाराम (3) संत ज्ञानेश्वर (4) संत नामदेव

---

58. __________ या भारताच्या नवनियुक्त महिला व बालकल्याण मंत्री आहेत.

(1) सुषमा स्वराज (2) उमा भारती (3) मेनका गांधी (4) स्मृती इराणी

---

59. 26 जानेवारी 13 ला सुवर्ण महोत्सव झालेल्या 'ये मेरे वतन के लोगो' या गीताबाबत पुढील कोणती विधाने लागू पडतात ?

(a) हे गीत 26 जानेवारीला नेहरुंच्या समोर सादर करण्यात आले.

(b) हे गीत लता मंगेशकर यांनी गायले आहे.

(c) हे गीत रामचंद्र नारायण द्विवेदी यांनी लिहिले आहे.

(d) या गीताला सी. रामचंद्र यांनी संगीत दिले आहे.

**पर्याय :**

(1) या गीताबाबत (a), (b), (c) आणि (d) ही विधाने लागू पडतात.

(2) या गीताबाबत (a) आणि (b) ही विधाने लागू पडतात.

(3) या गीताबाबत (a), (b) आणि (c) ही विधाने लागू पडतात.

(4) या गीताबाबत (a), (b) आणि (d) ही विधाने लागू पडतात.

---

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**

Teachingninja.in

60. प्रसिद्ध रंगभूषाकार __________ यांना 'जातीश्वर' या बंगाली भाषेतील चित्रपटासाठी 2013 चा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला.

(1) विक्रम गायकवाड (2) मोहन वाघ (3) भानू अचैय्या (4) सरोज खान

---

61. कॅथॉलिक ख्रिश्चनांचे सर्वोच्च धर्मगुरु पोप जॉर्ज बर्गोलिओ कोणत्या देशाचे आहेत ?

(1) अमेरिका (2) मेक्सिको (3) अर्जेंटिना (4) कोलंबिया

---

62. विष्णुशास्त्री पंडीत यांनी खालीलपैकी कोणते ग्रंथ लिहिले ?

(a) इंग्रजी मराठी कोश (b) मराठी लघु व्याकरण

(c) संस्कृत आणि महाराष्ट्र धातू कोश (d) स्मृतिशास्त्र

(1) (a) आणि (b) फक्त (2) (b) आणि (c) फक्त

(3) (a), (c) आणि (d) फक्त (4) (a), (b) आणि (d) फक्त

---

63. नोबेल पारितोषिक विजेते वैज्ञानिक रॉबर्ट एडवर्डस् यांचे नुकतेच निधन झाले. त्यांना नोबेल पारितोषिक कशावरील संशोधनासाठी मिळाले होते ?

(1) टेस्ट ट्यूब बेबी संदर्भातील (2) हृदय प्रत्यारोपण

(3) किडनी प्रत्यारोपण (4) यकृत प्रत्यारोपण

---

64. छत्रपती संभाजी राजांचा जन्म कोणत्या किल्ल्यावर झाला ?

(1) राजगढ (2) शिवनेरी (3) किल्ले पुरंदर (4) विशालगड

---

65. पंचायत राजचा स्वीकार करणारे भारतातील पहिले राज्य कोणते ?

(1) कर्नाटक (2) गुजरात (3) राजस्थान (4) आंध्र प्रदेश

---

66. 1973 मध्ये सुंदरलाल बहुगुणा यांच्या नेतृत्वाखालील चिपको आंदोलन कुठे सुरू झाले ?

(1) नवागढ (2) गढवाल (3) जुनागढ (4) हैद्राबाद

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

P.T.O.

Teachingninja.in

**67.** गरज पूर्ण न झाल्यामुळे दु:ख निर्माण होते. दु:खावर मात करणे हे चांगल्या समाजाचे उद्दिष्ट असले पाहिजे. असे विचार कुणाचे होते ?

(1) ॲरिस्टॉटल (2) गौतम बुद्ध (3) म. गांधी (4) येशू ख्रिस्त

---

**68.** 'दिल्ली मुंबईत आमचं सरकार – आमच्या गावात आम्हीच सरकार' ही घोषणा महाराष्ट्रातील कोणत्या गावाने दिली ?

(1) राळेगण सिद्धी (2) हिवरे बाजार (3) मेंढालेखा (4) साईगाटा

---

**69.** संविधान सभेच्या मूलभूत हक्क सल्लागार समितीचे अध्यक्ष कोण होते ?

(1) पंडित नेहरु (2) वल्लभभाई पटेल (3) डॉ. राजेंद्र प्रसाद (4) डॉ. आंबेडकर

---

**70.** पुढीलपैकी **योग्य** पर्यायाची निवड करा :

(a) ऑलिम्पिक स्पर्धा 2016 चे आयोजन ब्राझिलमध्ये होणार आहे.

(b) फिफा विश्व चषक फुटबॉल स्पर्धा - 2014 चे आयोजन ब्राझिलमध्ये झाले.

(1) फक्त (a) बरोबर (2) फक्त (b) बरोबर

(3) (a) व (b) दोन्ही बरोबर (4) (a) व (b) दोन्ही चूक

---

**71.** जोड्या जुळवा :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | गुरुवर्य बाबुराव जगताप | (i) | जाति निर्मूलन संस्था |
| (b) | के.वि. गोडबोले | (ii) | मासिक 'शिक्षक' |
| (c) | गंगारामभाऊ म्हसके | (iii) | मुंबई प्रांतिक सुधारणा मंडळाचे अध्यक्ष |
| (d) | ना.म. जोशी | (iv) | डेक्कन अॅसोसिएशन |

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (2) | (ii) | (i) | (iv) | (iii) |
| (3) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| (4) | (i) | (iii) | (iv) | (ii) |

---

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**

Teachingninja.in

72. साताऱ्याचे राजे प्रतापसिंहाचे वकील या नात्याने ________ इंग्लडला 15 वर्षे राहिले, परंतु काही उपयोग न झाल्याने 1854 ला भारतात परतले.

(1) सार्वजनिक काका
(2) रंगो बापूजी
(3) वासुदेव बळवंत फडके
(4) बाबासाहेब भावे

73. दुष्काळाचे वर्ष आणि त्यांच्या चौकशीसाठी नेमलेला आयोग यांच्या योग्य जोड्या लावा :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | इ.स. 1860 चा दुष्काळ | (i) | ल्यॉल आयोग |
| (b) | इ.स. 1866 - 67 चा दुष्काळ | (ii) | स्ट्रॅची आयोग |
| (c) | इ.स. 1876 - 78 चा दुष्काळ | (iii) | कॅम्पबेल आयोग |
| (d) | इ.स. 1896 - 97 चा दुष्काळ | (iv) | कर्नल स्मिथ आयोग |

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (2) | (iv) | (iii) | (i) | (ii) |
| (3) | (i) | (iii) | (iv) | (ii) |
| (4) | (i) | (ii) | (iv) | (iii) |

74. 1831 मध्ये मुंडा आदिवासींचे बंड पुढीलपैकी कोणत्या ठिकाणी पसरले होते ?

(a) रांची, छोटा नागपुर
(b) हजारीबाग, ओरिसा
(c) रांची, हजारीबाग, पालमाऊ, मानभूम
(d) बिहार फक्त

(1) (c) फक्त
(2) (a), (d)
(3) (b), (c)
(4) (c), (d)

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**



Teachingninja.in

**75.** लॉर्ड डलहौसीच्या साम्राज्य विस्तार धोरणासंदर्भात पुढीलपैकी कोणती विधाने **बरोबर** आहेत ?

(a) दत्तक वारस नामंजूर करुन सातारा व नागपूर ही राज्ये खालसा केली.

(b) युद्धमार्गाचा अवलंब करुन शिखांचे राज्य जिंकले.

(c) गैरकारभाराच्या कारणास्तव औंधचे राज्य खालसा केले.

(d) लष्करी कारवाई करुन पेशव्यांचे राज्य जिंकले.

(1) (a) फक्त
(2) (a), (b) आणि (c) फक्त
(3) (b), (c) आणि (d) फक्त
(4) (a), (b) , (c) आणि (d)

---

**76.** 'तृतीय रत्न' नाटकाचे लेखक कोण होते ?

(1) महात्मा फुले
(2) बाबासाहेब आंबेडकर
(3) विठ्ठल रामजी शिंदे
(4) सावित्रीबाई फुले

---

**77.** 10 जुलै 1930 रोजी 'पुसद' येथील जंगल सत्याग्रहाचे नेतृत्व __________ यांनी केले.

(1) राजूताई कदम
(2) लालजी पेंडसे
(3) बापूजी अणे
(4) श्रीनिवास देसाई

---

**78.** जोड्या जुळवा :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | हाल | (i) | हरिविजय काव्य |
| (b) | सर्वसेन | (ii) | गाथा सप्तशती |
| (c) | भास्कराचार्य | (iii) | चतुर्वर्ग चिंतामणी |
| (d) | हेमाद्रि पंडित | (iv) | सिद्धांत शिरोमणी |

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (i) | (iv) | (iii) |
| (2) | (ii) | (iii) | (i) | (iv) |
| (3) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (4) | (ii) | (iv) | (i) | (iii) |

---

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**

Teachingninja.in

79. भारतातील पहिली जनगणना __________ साली झाली.

(1) 1871 (2) 1927 (3) 1947 (4) 1857

---

80. महाराष्ट्रातील पहिली सहकारी सुतगिरणी 1960 साली _________ येथे स्थापन झाली.

(1) इचलकरंजी (2) सोलापूर (3) माळेगाव (4) भिवंडी

---

81. अन्न म्हणजे ऊर्जा ही ऊर्जा संक्रमित होऊन पर्यावरणात जाते व ऊर्जाचक्र पूर्ण होते.

(a) उत्पादक → प्राथमिक भक्षक → द्वितीयक भक्षक → तृतीयक भक्षक → विघटक

(b) सूर्य → पाणी → कार्बनडाय ऑक्साइड → जमीन/मृदा

(c) कृमी → कीटक → जीवाणू → बुरशी → कवके

(d) प्राथमिक भक्षक → द्वितीयक भक्षक → तृतीयक भक्षक → उत्पादक → विघटक

वरीलपैकी कोणते ऊर्जाचक्र **बरोबर** आहे ?

(1) (a) (2) (b) (3) (b) आणि (c) (4) (d)

---

82. आशिया खंडातील एकमेव भूमिगत वीजगृह कोठे आहे ?

(1) जायकवाडी प्रकल्प (2) तारापूर प्रकल्प (3) कोयना प्रकल्प (4) पूर्णा प्रकल्प

---

83. महाबळेश्वर पासून 15 किमी अंतरावर असलेल्या पाचगणीला महाबळेश्वरच्या निम्मासुद्धा पाऊस पडत नाही कारण -

(a) सह्याद्रीपर्यंत आलेले बाष्पयुक्त वारे सह्याद्री ओलांडे पर्यंत बाष्प खजिना गमावतात.

(b) पठारावर आल्यावर क्षीण बाष्पधारणशक्तीमुळे पर्जन्य देण्याऐवजी अधिक बाष्प सामावून घेतात.

(c) पश्चिम घाटातील वर्षाछायेचा परिणाम सौम्य झालेला असतो.

(d) बंगालच्या उपसागरावरून येणाऱ्या मौसमी वाऱ्यांमुळे पूर्व विदर्भातील पर्जन्यात फारच वाढ होते.

(1) (a) व (b) फक्त (2) (a), (c) व (d) फक्त

(3) (a), (b) व (c) फक्त (4) वरीलपैकी सर्व बरोबर

---

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**



Teachingninja.in

84. 'अ' स्तंभातील घटकांच्या 'ब' स्तंभातील घटकांशी योग्य जोड्या लावा :

| **'अ' महाराष्ट्रातील वने** | | **'ब' तापमान व पर्जन्य** | |
|---|---|---|---|
| (a) | उष्ण प्रदेशीय निमसदाहरीत वने | (i) | तापमान 20° ते 30° से. पर्जन्य 2000 मिमी पेक्षा जास्त |
| (b) | उष्ण प्रदेशीय आर्द्र पानझडी वने | (ii) | तापमान 35° ते 40° से. पर्जन्य 500 मिमी पेक्षा कमी |
| (c) | उष्ण प्रदेशीय शुष्क पानझडी वने | (iii) | तापमान 20° ते 30° से. पर्जन्य 1000 ते 2000 मिमी |
| (d) | उष्ण प्रदेशीय काटेरी वने | (iv) | तापमान 35° ते 40° से. पर्जन्य 500 ते 1000 मिमी |

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (iv) | (iii) | (ii) |
| (2) | (i) | (iii) | (iv) | (ii) |
| (3) | (iii) | (i) | (ii) | (iv) |
| (4) | (iii) | (iv) | (i) | (ii) |

---

85. ________ वर्षी लातूर येथे तर ________ वर्षी कोयना येथे भूकंप झाले.

(1) 1993, 1967 (2) 1983, 2001 (3) 2001, 2009 (4) 1991, 1966

---

86. जोड्या लावा :

| **जिल्हा** | | **गरम पाण्याचे झरे** | |
|---|---|---|---|
| (a) | ठाणे | (i) | सालबर्डी |
| (b) | जळगाव | (ii) | साव |
| (c) | अमरावती | (iii) | उनपदेव |
| (d) | रायगड | (iv) | अकलोणी |

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (iii) | (i) | (ii) |
| (2) | (iv) | (ii) | (iii) | (i) |
| (3) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (4) | (iv) | (iii) | (ii) | (i) |

---

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**

Teachingninja.in

87. जोड्या लावा :

| | जिल्हा | | साखर कारखाना |
|---|---|---|---|
| (a) | बीड | (i) | तुळशीदासनगर |
| (b) | अहमदनगर | (ii) | वृद्धेश्वर |
| (c) | सोलापूर | (iii) | कडा |
| (d) | कोल्हापूर | (iv) | हलकर्णी |

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (2) | (ii) | (i) | (iii) | (iv) |
| (3) | (iii) | (ii) | (i) | (iv) |
| (4) | (iii) | (iv) | (ii) | (i) |

---

88. महाराष्ट्रातील खालीलपैकी कोणती सिंचन पद्धत फार मोठ्या प्रमाणात वापरली जाते ?

(1) ठिबक सिंचन पद्धती
(2) मोकाट सिंचन पद्धती
(3) उपसा सिंचन पद्धती
(4) तलाव सिंचन पद्धती

---

89. (a) ज्वारीच्या उत्पादनात सोलापूर जिल्ह्याचा सर्वप्रथम क्रमांक लागतो.

(b) बागायती क्षेत्रात वाढ झाल्यामुळे पुर्वी ज्वारी घेत असलेल्या क्षेत्रांमध्ये आता व्यावसायिक पिके घेण्यावर जास्त भर दिला जातो.

वरीलपैकी कोणते/कोणती विधान/विधाने **बरोबर** आहेत ?

(1) फक्त (a)
(2) फक्त (b)
(3) (a) आणि (b)
(4) वरीलपैकी एकही नाही

---

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**



Teachingninja.in

**90.** (a) अहमदनगर ह्या सर्वात मोठ्या जिल्ह्याच्या सीमा ह्या सर्वाधिक म्हणजे सात जिल्ह्यांशी जोडलेल्या आहेत.

(b) मुंबई शहर ह्या सर्वात लहान जिल्ह्यांच्या सीमा ह्या सर्वात कमी म्हणजे दोन जिल्ह्यांशी जोडलेल्या आहेत.

वरीलपैकी कोणते विधान/विधाने **चुकीची** आहेत ?

(1) फक्त (a) (2) फक्त (b)

(3) (a) आणि (b) (4) वरीलपैकी एकही नाही

---

**91.** 2 ऑक्टोबर 2012 रोजी गांधी जयंतीच्या दिवशी मंगळवार होता, तर त्या महिन्यात कोणते वार पाच वेळा येतील ?

(1) सोमवार, मंगळवार, बुधवार (2) शनिवार, रविवार, सोमवार

(3) गुरुवार, शुक्रवार, शनिवार (4) मंगळवार, बुधवार, गुरुवार


---

**92.** 1.50 मीटर अंतरावर एक याप्रमाणे 27 मुलांना क्रिडांगणावर ओळीत उभे केले आहे. यातील ओळीच्या एका टोकापासून क्रमाने उभी असलेली दोन व ओळीत 14 व्या व 17 व्या क्रमांकावर उभी असलेली दोन अशी चार मुले आपापल्या जागा सोडून निघून गेली. उरलेल्या मुलांनी स्वत:च्या जागा बदलल्या नाहीत. तर आता ओळीच्या टोकाला असलेल्या मुलांच्या दरम्यानचे अंतर किती ?

(1) 34.50 मीटर (2) 36 मीटर (3) 39 मीटर (4) 37.50 मीटर

---

**93.** खालील प्रश्न आकृतीचे जल प्रतिबिंब दर्शवणारा पर्याय निवडा -



(1)  (2)  (3)  (4) 

---

**94.** 3 + 33 + 333 + 3333 + _________ या क्रमाने वाढत जाणाऱ्या या मालिकेत एकूण नऊ पदे आहेत. त्यांची बेरीज केल्यावर बेरजेत दशक स्थानी कोणता अंक येईल ?


(1) 2 (2) 5 (3) 6 (4) 3

---

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**

Teachingninja.in

**95.** खालील आकृतीत प्रश्नचिन्हाच्या जागी कोणते अक्षर येईल ?




(1) O (2) M (3) S (4) Q

---

**96.** एका गाडीने ताशी 40 कि.मी. वेगाने पहिला अर्धा प्रवास पूर्ण केला व ताशी 60 कि.मी. वेगाने दुसरा अर्धा प्रवास पूर्ण केला तर त्या गाडीचा सरासरी वेग किती होता ?

(1) ताशी 48 कि.मी. (2) ताशी 50 कि.मी. (3) ताशी 54 कि.मी. (4) ताशी 60 कि.मी.

---

**97.** प्रश्नार्थक चिन्हाच्या जागी योग्य पर्याय निवडा :

| | | |
|---|---|---|
| 2 | 7 | 12 |
| 17 | 12 | ? |
| 10 | 15 | 17 |
| 340 | 845 | 487 |

(1) 5 (2) 8 (3) 7 (4) 4

---

**98.** मारुती व त्याच्या चार मुलांच्या वयांची सरासरी 18 आहे. सर्वात लहान मुलाचे वय 8 वर्षे आहे. मुलांमध्ये 2 - 2 वर्षाचे अंतर आहे. तर मारुतीचे वय किती ?

(1) 44 (2) 46 (3) 48 (4) 50

---

**99.** मण्यांच्या सहाय्याने एक चौरस तयार करत असताना, चारी बाजूंवर समान अंतरावर नऊ मणी असले पाहिजेत तर एकूण मणी किती लागतील ?

(1) 36 (2) 33 (3) 34 (4) 32

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**



Teachingninja.in

**100.** एका चौरसाची परिमिती 32 सें.मी. असल्यास त्याच्या कर्णाची लांबी किती ?

(1) 8 सें.मी. (2) 64 सें.मी. (3) $8\sqrt{2}$ सें.मी. (4) $16\sqrt{2}$ सें.मी.

---

**101.** विसंगत अक्षर गट ओळखा –

DIMP, RWAE, ZEIL, FKOR, VAEH

(1) RWAE (2) ZEIL (3) FKOR (4) VAEH


---

**102.** घोड्याला गाढव म्हटले, गाढवाला झेब्रा म्हटले, झेब्राला हत्ती म्हटले, हत्तीला वाघ म्हटले तर सोंड असणारा प्राणी कोणता असेल ?

(1) वाघ (2) गाढव (3) झेब्रा (4) हत्ती

---

**103.** आकृतीत दाखवलेल्या चौरस जोडणीची घडी घालून ठोकळा तयार केला तर A या वर्णाक्षराच्या संमुख पृष्ठावर कोणते अक्षर येईल ?




(1) C (2) E (3) D (4) F

---

**104.** प्रश्नचिन्हाच्या जागी उचित अक्षर व अंक असलेला पर्याय कोणता ?

| | | | | |
|---|---|---|---|---|
| E | H | K | N | ? |
| 7 | 10 | 13 | 16 | ? |

(1) $\frac{P}{18}$ (2) $\frac{R}{20}$ (3) $\frac{T}{22}$ (4) $\frac{Q}{19}$

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

Teachingninja.in

Teachingninja.in

**105.** जर $\frac{LO}{F} = 30$ तर $\frac{JQ}{E} = ?$

(1) 10 (2) 34 (3) 25 (4) 30

---

**106.** एका सांकेतिक भाषेत ACHIEVE हे IDBHFWF असे लिहिले जाते तर BROUGHT हे कसे लिहिता येईल ?

(1) PSCUTIH (2) PSCTUIH (3) HIUTCSP (4) HIVTPSC

---

**107.** एका स्पर्धेत भाग घेण्यासाठी 9 खेळाडू मैदानात उभे आहेत. प्रत्येक खेळाडूने परिचय करून देताना राहिलेल्या सर्व खेळाडूंशी एकेकदा हस्तांदोलन केले. तर तेथे एकूण किती हस्तांदोलने होतील ?

(1) 48 (2) 36 (3) 60 (4) 72

---

**108.** खाली दिलेल्या संख्या क्रमावलीत कोणती संख्या क्रमावलीच्या नियमांशी विसंगत आहे ?



8, 11, 16, 23, 31, 43

(1) 11 (2) 23 (3) 31 (4) 43

---

**109.** खालील तीन घटकांमधील संबंध दर्शविणारी योग्य आकृती कोणती ?

स्त्रिया, माता, सरपंच

(1)  (2)  (3)  (4) 

---

**110.** 300 मीटर लांबीच्या आगगाडीस ताशी 78 कि.मी. वेगाने एक पूल ओलांडण्यासाठी एक मिनिट वेळ लागतो तर पूलाची लांबी किती मीटर असेल ?

(1) 1200 मीटर (2) 1000 मीटर (3) 1100 मीटर (4) 1300 मीटर

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**



Teachingninja.in

**111.** सोबतच्या चौकटीतील बेरजेच्या उदाहरणात संख्या चिन्हांऐवजी अक्षरांचा वापर केलेला आहे MAN ही अक्षरे कोणत्या अंकांसाठी अनुक्रमे वापरलेली आहेत ते ओळखा ?

| | | | |
|---|---|---|---|
| | M | A | N |
| | M | A | N |
| + | M | A | N |
| | N | N | N |

(1) 1, 5, 8 (2) 8, 1, 5 (3) 1, 8, 5 (4) 5, 8, 1

---

**112.** एका शेतात काही मेंढ्या व काही मेंढपाळ आहेत मेंढ्या व मेंढपाळ यांच्या पायांची एकूण संख्या 98 आहे व डोक्यांची संख्या 26 आहे तर त्या ठिकाणी मेंढ्या व मेंढपाळ यांची प्रत्येकी संख्या किती ?

(1) 23, 3 (2) 24, 2 (3) 25, 1 (4) 22, 4

---

**113.** चार क्रमवार सम संख्यांची सरासरी 27 असल्यास मोठी संख्या कोणती ?

(1) 28 (2) 30 (3) 32 (4) 36

---

**114.** खालील संख्या मालिकेत प्रश्न चिन्हाच्या ठिकाणी कोणती संख्या येईल ?

$3, \frac{4}{3}, \frac{7}{12}, \frac{?}{\quad}, \frac{103}{1596}$

(1) $\frac{11}{15}$ (2) $\frac{21}{48}$ (3) $\frac{19}{84}$ (4) $\frac{28}{19}$

---

**115.** खालील समानतेत प्रश्न चिन्हांच्या जागी कोणती दोन चिन्हे क्रमाने येतील ?

98 = 2 _?_ 8 _?_ 12

(1) × + (2) × × (3) ÷ × (4) + ×

---

**116.** गौरीचा जन्म शुक्रवार दि. 10 सप्टेंबर 1993 रोजी झाला तर तिचा तिसरा वाढदिवस कोणत्या वारी आला असेल ?


(1) सोमवार (2) मंगळवार (3) बुधवार (4) गुरुवार

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

Teachingninja.in

**117.** खालील आकृतीत प्रश्नचिन्हाच्या जागी कोणती संख्या येईल ?




(1) 95 (2) 115 (3) 75 (4) 110

---

**118.** पुढील शृंखला पूर्ण करणारी संख्या कोणती ?

7, 26, 124, __?__ , 1330

(1) 344 (2) 342 (3) 729 (4) 512

---

**119.** 100 विद्यार्थ्यांची एक स्पर्धा घेण्यात आली. त्यात प्रथम क्रमांकाच्या विद्यार्थ्याला 100 रुपये, दुसऱ्या क्रमांकाच्या विद्यार्थ्याला 99 रुपये, तिसऱ्या क्रमांकाच्या विद्यार्थ्याला 98 रुपये बक्षीस मिळाले. अशा पद्धतीने सर्व 100 विद्यार्थ्यांना बक्षीसांची वाटणी केली असता शेवटच्या विद्यार्थ्याला 1 रुपया बक्षीस मिळाला. यावरून या स्पर्धेत एकूण किती रक्कम बक्षीस म्हणून वाटण्यात आली ?

(1) 1000 रुपये (2) 5050 रुपये (3) 5000 रुपये (4) 5500 रुपये

---

**120.** खाली अक्षरांचे गट दिले आहेत त्या गटांचे वैशिष्ट्य ओळखून क्रमाने गटात बसणारे पद दिलेल्या पर्यायांतून निवडा -

CX, IR, LO, RI, __?__

(1) SG (2) RJ (3) UF (4) DW

---

**121.** पहिल्या पदाचा दुसऱ्या पदाशी जो संबंध आहे तोच संबंध तिसऱ्या पदाचा चौथ्या पदाशी आहे, हे लक्षात घेऊन प्रश्नचिन्हाच्या जागी येणारी संख्या कोणती ?

1 : 04 : : 05 : __?__

(1) 06 (2) 13 (3) 24 (4) 36

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**



Teachingninja.in

122. एका सांकेतिक भाषेत, 'वरचढ' हा शब्द 'लयङड' असा लिहितात तर 'रजत' हा शब्द कसा लिहाल ?

(1) लथण (2) यछण (3) लझण (4) लछन

---


123. खाली दिलेल्या विधानाच्या मोकळ्या जागी गणिती क्रियांच्या अशा चिन्हांचा गट पर्यायी उत्तरांमधून शोधा की ती चिन्हे क्रमाने मोकळ्या जागी लिहिल्यास विधान सत्य होईल ?




8 ___ 7 ___ 4 ___ 28 ___ 7 = 72

(1) +, ÷, ×, ÷ (2) +, +, −, + (3) ×, +, ×, ÷ (4) ×, ÷, ÷, ×

---


124. पुढील प्रतिमेतील गाळलेल्या जागी ठेवण्यासाठी उचित पर्याय निवडा :



(1)  (2)  (3)  (4) 

---

125. खालील आकृतीत एकूण किती चौकोन आहेत ?



(1) 20 (2) 18 (3) 16 (4) 14

---

126. जर 24 × 35 = 14, 48 × 56 = 23 व 74 × 35 = 19 तर 84 × 37 = ___?___

(1) 22 (2) 20 (3) 21 (4) 18

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

127. एका शाळेत विद्यार्थी व शिक्षक यांची एकूण संख्या 1564 आहे. त्या शाळेत प्रत्येक 16 विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक आहे तर एकूण शिक्षकांची संख्या किती ?

(1) 98 (2) 95 (3) 92 (4) 90

---

128. खालील मालिकेतील विसंगत संख्या ओळखा :

576, 288, 144, 72, 34

(1) 576 (2) 288 (3) 144 (4) 34

---

129. जर TAKE – MAKE = 7 तर SOON – MOON = __?__

(1) 6 (2) 7 (3) 8 (4) 10

---

130. एका थैलीत एक रुपयांची, 50 पैशांची व 25 पैशांच्या नाण्यांची संख्या समान असून थैलीत एकूण 105 रुपये आहेत तर प्रत्येक प्रकारच्या नाण्यांची संख्या किती ?

(1) 60 (2) 90 (3) 21 (4) 50

---

131. औद्योगीकरणामुळे गेल्या 10 वर्षात एका शहराची लोकसंख्या दर 5 वर्षात शेकडा 7 ने वाढत गेली. आज शहराची लोकसंख्या 1,14,490 आहे, तर 10 वर्षापूर्वी त्या शहराची लोकसंख्या किती होती ?

(1) 1 लाख (2) 1 लाख 490 (3) 1 लाख 476 (4) 1 लाख 504

---

132. 15 मुलांची सरासरी उंची 5 फुट 2 इंच आहे. त्यात एका नवीन मुलाची उंची मिळविल्यानंतर सरासरी 5 फुट 1 इंच होते, तर नवीन मुलाची उंची किती ?

(1) 3 फुट 5 इंच (2) 5 फुट 1 इंच (3) 3 फुट 10 इंच (4) 4 फुट 5 इंच

---

133. एका परीक्षेस 1200 मुले व 800 मुली बसले होते, त्यामध्ये 40% मुले आणि 48% मुली पास झाले. तर परीक्षेमध्ये किती टक्के विद्यार्थी नापास झाले ?

(1) 56.8 (2) 64.8 (3) 72.4 (4) 52.8

---

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**



Teachingninja.in

**134.** $(999)^2 - (998)^2 =$ किती ?

(1) 1 (2) 1365 (3) 1997 (4) 1002

---

**135.** जर $0.004x = 0.04y$ असेल तर $\frac{x+y}{x-y}$ ची किंमत किती ?

(1) $1\frac{2}{9}$ (2) $9\frac{1}{2}$

(3) $\frac{9}{11}$ (4) वरीलपैकी एकही नाही

---

**136.** यश व गणेश यांच्या वयांची सरासरी 13 वर्षे आहे आणि गणेश व पुर्वा यांच्या वयांची सरासरी 20 वर्षे आहे. जर पुर्वा व यश यांच्या वयांची बेरीज 36 वर्षे असेल, तर पुर्वाचे वय किती वर्षे असेल ?

(1) 13 (2) 18 (3) 20 (4) 25

---

**137.** एका क्रिकेट मॅचमध्ये अजयने घेतलेल्या विकेट्सची संख्या अमरने घेतलेल्या विकेट्सच्या संख्येच्या दुप्पटीपेक्षा 3 ने कमी आहे. त्यांनी घेतलेल्या विकेट्सच्या संख्याचा गुणाकार 20 असल्यास प्रत्येकाने घेतलेल्या विकेट्सची संख्या शोधा.

(1) अमर = 2, अजय = 10 (2) अमर = 4, अजय = 5

(3) अमर = 10, अजय = 2 (4) अमर = 5, अजय = 4

---

**138.** एका जंगलात दोन वर्षापूर्वी 30,000 सागाचे वृक्ष होते. वृक्षतोडीमुळे दरवर्षी त्यांची संख्या शेकडा 6 ने घटली, तर आज त्या जंगलात सागाचे किती वृक्ष असतील ?

(1) 28,200 (2) 26,508 (3) 27,580 (4) 28,800

---

**139.** एका घनाचे घनफळ 1000 घन सेंमी आहे तर घनाच्या पृष्ठभागाचे क्षेत्रफळ किती ?

(1) 600 (सेंमी)$^2$ (2) 100 वर्ग सेंमी (3) 10 वर्ग सेंमी (4) 616 वर्ग सेंमी

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

Teachingninja.in

140. $\left(-\frac{3}{5}\right)-\left[\left(-\frac{2}{7}\right)-\left(-\frac{3}{4}\right)\right]=?$

(1) $-\frac{149}{140}$ (2) $-\frac{19}{140}$ (3) $-2.06428$ (4) $-\frac{140}{149}$

141. $2\frac{8}{9}\times 1\frac{4}{5}\div 2\frac{1}{5}+3\frac{1}{9}\times\frac{1}{11}=?$

(1) 2.64 (2) 2.646 (3) 2.6464... (4) 2.647

142. $\frac{(0.07)^2+(0.53)^2+(0.078)^2}{(0.007)^2+(0.053)^2+(0.0078)^2}$ ची किंमत काढा.

(1) 0.1 (2) 10 (3) 100 (4) 1000

143. सरस्वती विद्यालयात गतवर्षी 320 मुले होती. चालु वर्षी 368 मुले आहेत तर मुलांच्या संख्येत शेकडा वाढ किती झाली ?

(1) 10 (2) 12 (3) 13 (4) 15

144. दोन संख्यांची बेरीज 97 आहे. जर त्यातील मोठ्या संख्येला छोट्या संख्येने भागले तर भागाकार 7 असून बाकी 1 राहते तर त्या संख्या ओळखा.

(1) 82, 15 (2) 86, 11 (3) 84, 13 (4) 85, 12

145. 1 वर्ष 3 महीने + 2 वर्ष 11 महीने − 3 वर्ष 5 महीने = ?

(1) $\frac{8}{12}$ वर्ष (2) $\frac{3}{4}$ वर्ष (3) $\frac{1}{3}$ वर्ष (4) $\frac{1}{2}$ वर्ष

146. 321*7 या संख्येला 9 ने पूर्ण भाग जाण्यासाठी * च्या ठिकाणी कोणता अंक असावा ?

(1) 4 (2) 5 (3) 6 (4) 7

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

P.T.O.

Teachingninja.in

**147.** खालीलपैकी कोणते विधान/विधाने **चुकीची** आहेत ?

(a) खंडीत दशांश रूपातील संख्या अखंड आवर्ती रुपात लिहीता येते.

(b) ज्या संख्येचे दशांशरूप अखंड व अनावर्ती असते, त्या संख्येला अपरिमेय संख्या म्हणतात.

(c) परिमेय संख्या अखंड आवर्ती दशांश रूपात लिहीता येत नाही.

(1) (a), (c) (2) (b), (c) (3) (c) (4) (b)

---

**148.** मुलाच्या वयाची दुप्पट त्याच्या वडिलांच्या वयात मिळवली तर वयांची बेरीज 70 वर्षे होते आणि वडिलांच्या वयाची दुप्पट त्यांच्या मुलाच्या वयात मिळवली तर वयांची बेरीज 95 वर्षे होते. तर वडिलांचे व मुलाचे वय किती ?

(1) 30, 15 (2) 30, 10 (3) 40, 15 (4) 15, 30

---

**149.** 22, 35, 40, 27, 29, 24, 32, 26 या संख्यांचा मध्यांक काय आहे ?

(1) 27 (2) 28 (3) 29 (4) 29.3

---

**150.** 5 मी. लांब, 80 सें.मी. रूंद व 20 सें.मी. ज़ाडीच्या लाकडी खांबातून 2.5 मी लांब; 20 सें.मी. रूंद व 2 सें.मी. जाडीच्या किती फळ्या निघतील ?

(1) 60 (2) 80 (3) 75 (4) 70

---

**151.** जर $\frac{1}{4.378} = 0.2284$ असेल तर $\frac{1}{0.00004378}$ ची किंमत काय असेल ?

(1) 228400 (2) 22840 (3) 228.40 (4) 2284

---

**152.** 1 ते 100 अंकांची सरासरी ही 1 ते 60 अंकांच्या सरासरीपेक्षा कितीने जास्त आहे ?

(1) 20.2 (2) 30.5 (3) 20 (4) 50.50

---

**153.** जर $\frac{17}{18} = a$ व $\frac{18}{19} = b$ असेल तर खालीलपैकी कोणता पर्याय अचूक आहे ?

(1) $b < a$ (2) $a - b < 0$ (3) $\frac{a}{b} = \frac{17}{19}$ (4) $ab = \frac{19}{17}$

---

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**

Teachingninja.in

**154.** 92 व 70 या संख्यांचे ल.सा.वि. व म.सा.वि. अनुक्रमे खालीलप्रमाणे आहेत.

(1) 2 व 1610 (2) 6440 व 2 (3) 3220 व 2 (4) 3220 व 4

**155.** 50 संख्यांची सरासरी 40 आहे परंतु त्यात एक संख्या 42 ऐवजी 17 घेण्यात आली तर वास्तव सरासरी किती ?

(1) 40 (2) 40.5 (3) 41 (4) 41.5

**156.** व्यापारी एक वस्तु 300 रुपयाला विकत घेतो. त्यावर त्याला अशी छापील किंमत लिहावयाची आहे की लेबलावरील किंमतीवर 10% सूट दिल्यानंतर त्याला खरेदीवर 20% नफा होईल तर त्याने काय किंमत छापावी ?

(1) 330 रु. (2) 360 रु. (3) 396 रु. (4) 400 रु.

**157.** $\dfrac{32^{2/5} \times 4^{-1/2} \times 8^{1/3}}{2^{-2} \div 64^{-1/3}} = ?$

(1) 2 (2) 4 (3) 8 (4) 16

**158.** जर $7*5 + *32 + 43* = 1833$, तर $* =$ किती ?

(1) 7 (2) 6 (3) 5 (4) 3

**159.** रमा मालाहून 3 वर्षांनी लहान आहे. दोन वर्षानंतर त्यांच्या वयांचे गुणोत्तर 5 : 6 असे असेल तर रमाचे सध्याचे वय किती ?

(1) 13 (2) 16 (3) 15 (4) 18

**160.** जर $\dfrac{p}{q} = 0.23535...$ असेल तर p आणि q च्या किंमती किती ?

(1) $p = 233,\ q = 900$ (2) $p = 233,\ q = 990$

(3) $p = 230,\ q = 990$ (4) वरीलपैकी एकही नाही

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**



Teachingninja.in

**161.** वंदनाची उंची रेखाच्या उंचीपेक्षा 40% ने कमी आहे. तर रेखाची उंची वंदनाच्या उंचीपेक्षा ________% ने जास्त आहे.

(1) 33.33 (2) 40 (3) 60 (4) 66.66

---

**162.** जर $367.45 \times 10^k = 36745000$ असेल तर k ची किंमत काय असेल ?

(1) 3 (2) 4 (3) 5 (4) 6

---

**163.** एका संख्येच्या दुप्पटीत त्याच संख्येची $\frac{3}{4}$ पट संख्या मिळविली असल्यास बेरीज $3\frac{1}{2}$ येते, तर ती संख्या कोणती ?

(1) $\frac{5}{11}$ (2) $2\frac{1}{3}$ (3) $1\frac{3}{11}$ (4) यापैकी एकही नाही

---

**164.** 25 ते 37 मधील सम संख्यांची सरासरी किती ?

(1) 30 (2) 31 (3) 29.5 (4) 30.5

---

**165.** नेहाने प्रश्नपत्रिकेतील 18 प्रश्न सोडवले, बरोबर उत्तराबद्दल प्रत्येकी 5 गुण मिळून व चुकीच्या उत्तराबद्दल प्रत्येकी 1 गुण कापला जाऊन तिला एकूण 78 गुण मिळाले. तर तिने किती प्रश्न बरोबर सोडवले ?

(1) 10 (2) 12 (3) 14 (4) 16

---

**166.** जर $\left(a^{2/3} b^{1/4} \times b^{-1/3} c^{-1/2} \times a^{3/4} c^{1/3}\right)^{-3/4} = a^x b^y c^z$ असेल तर $x, y, z$ च्या किमती किती ?

(1) $\frac{17}{16}, \frac{-1}{16}, \frac{1}{8}$ (2) $\frac{-17}{16}, \frac{-1}{16}, \frac{-1}{8}$

(3) $\frac{-17}{16}, \frac{1}{16}, \frac{1}{8}$ (4) वरीलपैकी एकही नाही

---

**167.** जर $(349 \times 56 \times 38* \times 354)$ च्या गुणाकारामध्ये एकक स्थानाचा अंक 8 असेल तर * या ठिकाणी कोणता अंक असेल ?

(1) 7 (2) 2 (3) 3 (4) 4

---

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**

Teachingninja.in

**168.** 1300 चे 5% = N चे 20% तर N = किती ?

(1) 325 (2) 5200 (3) 260 (4) 200

**169.** तांबे व जस्त यांच्या संमिश्राने 5 कि.ग्रॅ. वजनाचा धातूचा एक गोळा तयार केला. जर त्या गोळ्यामध्ये 35.5% जस्त असेल. तर त्यामध्ये किती ग्रॅम तांबे असेल?

(1) 3225 (2) 1775 (3) 1.775 (4) 3.225

**170.** एका गावात 2460 हेक्टर जमीन शेतीखाली आहे. त्यापैकी 57% गव्हाखाली, 52% ज्वारीखाली व 36% गहू आणि ज्वारी व्यतिरीक्त अन्य पिकाखाली आहे, तर गहू आणि ज्वारी ही दोन्ही पिके ज्या जमीनीत काढली जातात अशी किती हेक्टर जमीन गावात आहे?

(1) 1,105 हेक्टर (2) 1,106 हेक्टर (3) 1,107 हेक्टर (4) 1,108 हेक्टर

**171.** Choose the correct alternative and complete the sentence.

He must apologise ________.

(1) so that he may be punished (2) yet he will be punished

(3) or he will be punished (4) unless he will be punished

**172.** In the following sentence choose the part in which you find a mistake.

Either of the two (a) were (b) supposed to be (c) present in the office (d)

(1) (a) (2) (b) (3) (c) (4) (d)

**173.** Use the correct alternative.

I could not use his car because it ________.

(1) was having repaired (2) was being repaired

(3) had been repaired (4) was repairing

**174.** Fill in the blank with an acceptable form of the verb given in the options :

350 runs ________ quite a decent score.

(1) is (2) are (3) are being (4) was become

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**



Teachingninja.in

**175.** Which one of the following is correct passive voice for the sentence.

"They have repaid the loan".

(1) The loan is repaid by them.

(2) The loan have repaid by them.

(3) The loan has been repaid by them.

(4) The loan have been repaid by them.

---

**176.** Choose the correct indirect sentence from the alternatives.

My friend Said, "Hello! What are you doing here ?"

(1) My friend said to me hello, what I was doing there

(2) My friend greeted me and asked me what I was doing there

(3) My friend said hello to me and asked me what was I doing there

(4) My friend wished me and wanted to know that what I was doing there

---

**177.** Choose the correct alternative to complete the sentence.

How long has he been sleeping ?

He _____ for two hours.

(1) has been sleeping (2) was sleeping

(3) slept (4) has slept

---

**178.** Choose the correct alternative.

This document _______ by two persons.

(1) has signed (2) had been sign (3) was signed (4) was signing

---

**179.** How many parts of speech are there in English Language ?

(1) Four (2) Seven (3) Eight (4) Six

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

**180.** Rewrite the sentence given below with the right punctuation marks :

What a tall boy you have become she said

(1) "What a tall boy you have become ?" she said.

(2) "What a tall boy you have become," she said.

(3) "What a tall boy you have become!" she said.

(4) "What ? A tall boy you have become!" she said.

---

**181.** Choose the correct alternative to complete the sentence.

Children ________ not eat chocolates.

(1) Shall (2) Will (3) Should (4) Would

---

**182.** Fill the blank spaces with the right pair of words :

The bank functions ________ 10.00 a.m. ________ 5.00 p.m.

(1) ... between ... and ....
(2) ... between ... to ... .
(3) ... from ... to ....
(4) ... at ... and ... .

---

**183.** Fill in the blank with an acceptable form of the verb given in the options.

My father ________ many friends.

(1) have (2) has (3) want (4) is wanting

---

**184.** Shakespeare is the greatest of English dramatists

(Change into the comparative degree).

(a) Shakespeare is as great as other English dramatist.

(b) Shakespeare is the greatest English dramatist.

(c) Shakespeare is the best English dramatist.

(d) Shakespeare is greater than any other English dramatist.

Which of the statement given above is correct ?

(1) (a) only
(2) (b) and (c)
(3) (d) only
(4) None of the above

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**



Teachingninja.in

**185.** Do as directed by instructions given in the bracket.

He is too poor to buy a radio (Remove too)

(1) He is so poor that he cannot buy a radio.

(2) So poor he is that he cannot buy a radio.

(3) Poor so he is that he cannot buy a radio.

(4) He cannot buy a radio because he is so poor.

---

**186.** Which part of the sentence given below contains an error, if any ?

<u>I think so</u> <u>that some help from you</u> <u>will help him</u>

(a) (b) (c)

(1) (a) (2) (b) (3) (c) (4) No error

---

**187.** The past subjunctive is the hypothetical subjunctive. It is restricted to :

(1) Shall (2) Will (3) Can (4) Were

---

**188.** The plurals such as, 'mens', 'childrens' are known as :

(1) Zero plurals (2) Regular plurals (3) Double plurals (4) Mutation plurals

---

**189.** Change the following into Passive Voice.

We ought to respect the elders.

(1) The elders ought to be respected by us

(2) We should respect the elders

(3) The elders need to be respected by us

(4) The elders should earn respect by us

---

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**

Teachingninja.in

**190.** Choose the correct indirect speech for the given sentence.

"What a hopeless fellow you are!" Said the teacher to the student

(1) The teacher told the student that you are a hopeless fellow

(2) The teacher told the student that he was a very hopeless fellow

(3) The teacher said what a hopeless fellow the student was

(4) The teacher exclaimed that the student was what a hopeless fellow

---

**191.** Do as directed as per the instructions given in the bracket.

She is the best girl in the school (make it positive)

(1) No other girl in the school is as good as she is

(2) She is the only good girl in the school

(3) In the school only she is the good girl

(4) She is good girl only in the school

---

**192.** A compound sentence has.

(1) One clause (2) One or more coordinate clauses

(3) One or more subordinate clauses (4) No clause

---

**93.** The comparative degree of the sentence :

"Mumbai is a rich city of India." is :

(1) Mumbai is one of the richest cities in India

(2) Very few cities in India are as rich as Mumbai

(3) No other city is as rich as Mumbai

(4) Mumbai is richer than most other cities in India

---

च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

**194.** Which of the following sentences is/are grammatically **correct** ?

(i) She leaves for London this evening.

(ii) He is having many friends.

(iii) I am wanting a glass of water.

(iv) The rain has been raining very hard.

**Answer Options :**

(1) Only (i)
(2) Only (ii)
(3) Only (i), (ii) and (iv)
(4) Only (ii), (iii) and (iv)

---

**195.** Which of the following sentences may indicate a future event ?

(i) The movie starts in ten minutes.

(ii) The sample will be sent for detailed examination.

(iii) You should finish the work before you leave.

**Answer Options :**

(1) Only (i) and (ii)
(2) Only (ii)
(3) Only (ii) and (iii)
(4) All three

---

**196.** What does the underlined word express ?

The train <u>should</u> arrive any time now.

(1) Necessity
(2) Expectation
(3) Suggestion
(4) Instruction

---

**197.** Pick the correct choice from the ones given below.

Inspite of being very rich, he is very humble

He is very rich :

(1) but he is very humble
(2) however he is very humble
(3) yet he is very humble
(4) not withstanding he is very humble

---

**198.** Choose the correct verb from the alternatives.

The Headmaster ________ to speak to you.

(1) wanting
(2) was wanting
(3) wants
(4) is wanting

---

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**

Teachingninja.in

199. Match the following :

| | (A) | | (B) |
|---|---|---|---|
| (a) | a place where birds are kept | (i) | eccentric |
| (b) | a tank for fish | (ii) | inanimate |
| (c) | a man of unusual habit | (iii) | acquarium |
| (d) | an object which has no life | (iv) | aviary |

**Answers :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (iii) | (i) | (ii) |
| (2) | (iii) | (ii) | (i) | (iv) |
| (3) | (ii) | (i) | (iii) | (iv) |
| (4) | (i) | (iv) | (ii) | (iii) |

---

200. Identify the grammatically incorrect sentence :

(1) I don't know why is he upset
(2) Why are you not working ?
(3) How lazy he is!
(4) What beautiful flowers these are!

---

-o0o-

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**



Teachingninja.in

## सूचना — (पृष्ठ 1 वरून पुढे....)

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदींनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षा कक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

### नमुना प्रश्न

Q. No. 201. "अंगावर काटा उभा रहाणे" या वाक्प्रचारचा अर्थ काय ?

(1) अंग शहारणे (2) रोमांचित होणे

(3) अतिशय भीती वाटणे (4) बहरून येणे

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) अतिशय भीती वाटणे" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. 201 समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र. क्र. 201. ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**

Teachingninja.in